# छत्रपती संभाजी महाराज
# (दि.१४ मे, १६५७ -११ मार्च, १६८९)
# (अल्प परिचय)

छत्रपती शिवाजी महाराजांनंतर मराठ्यांच्या गादीवर आलेले हे दुसरे छत्रपती. त्यांचा जन्म छत्रपती शिवाजी महाराज व सईबाई यांच्या पोटी पुरंदर किल्ल्यावर (पुणे जिल्हा) झाला.

छत्रपती संभाजी महाराजांच्या *"बुधभूषण"* या ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. या शिवाय गागाभट्टांकडून "नीतिपर *समयनय"* हा ग्रंथ (पोथी) त्यांनी लिहून घेतला.

संभाजी महाराजांचा विवाह पिलाजीराजे शिर्के यांची कन्या राजसबाई बरोबर झाला (१६६५). तिचे नाव येसूबाई ठेवण्यात आले. येसूबाईंपासून त्यांना कन्या भवानीबाई (१६७८) आणि पुत्र शिवाजी (१६८२-छत्रपती शाहू) ही दोन अपत्ये झाली.

वयाच्या नवव्या वर्षीच ते मोगली मनसबदार बनले. सन १६७२ पासून त्यांनी प्रत्यक्ष लढाईत भाग घेतल्याचा उल्लेख आढळतो. त्यांनी कलीची उपासना केली आणि नंतर कलशाभिषेक करून घेतला (दि.२३ मार्च १६७८). दि.१८ जून १६८० रोजी ते रायगडास पोहोचले आणि जुलैमध्ये त्यांनी स्वतः मंचकारोहण करून पुढे दि.१६ जानेवारी १६८१ रोजी रायगड येथे विधिवत "राज्याभिषेक" करून घेतला.

संभाजी महाराजांनी सिद्दीच्या उंदेरीवर हल्ले चढविले (जुलै १६८१). पुढे सन १६८१ ची जंजिऱ्याची मोहीम हाती घेतली. जंजिऱ्याची खाडी दगड, लाकूड, कापसाच्या गाठी यांनी भरून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु खवळलेल्या समुद्रामुळे तो निष्फळ ठरला, तरी सुद्धा हा अयशस्वी वेढा पुढे आठ महिने चालला. समुद्रातील या लढाईमुळे संभाजी महाराजांनी आपले नौदल आणि आरमार मोठया प्रमाणात वाढविले. त्यातूनच पुढे प्रसिद्ध आंग्रे घराण्याचा उदय झाला. संभाजी महाराजांनी सन १६८२ मध्ये अंजदीव बेटावर स्वारी केली. संभाजी महाराजांनी खंदेरी इंग्रजांस देण्याचा विचार मान्य केला नाही. संभाजी महाराजांनी उत्तर कोकणातील दोन किल्ले जिंकून घेतले (१६८३), तसेच जुनी साष्टी व बारदेस येथेही चढाई केली.

**छत्रपती संभाजी-मुघल संघर्ष :**

संभाजी महाराज, आदिलशाह आणि कुतुबशहा यांचा गट तयार होऊन या त्रिकूटाने मुघलांशी सामना देण्याची तयारी केली. त्यांची उभी कारकीर्द औरंगजेबाविरूद्ध लढा देण्यात गेली. प्रारंभी त्यांच्या फौजांनी बुऱ्हाणपूर काबिज केले. औरंगाबादच्या सभोवतालचा मुलूख जिंकला (१६८१). मुघलांच्या या आक्रमणाचा त्यांनी चांगलाच प्रतिकार केला. त्यांनी गोवळकोंडेकर आणि विजापूरकर यांना मुघलांविरूद्ध वेळोवेळी मदत केली.

सन १६८७ ते ८९ पर्यंतच्या काळात मुघलांनी सर्व बाजूंनी संभाजी महाराजांस वेढले असले तरी सातारा विभागातील सातारा, परळी, निंब, चंदन-वंदन, कऱ्हाड, माजगाव, मसूर हे, तर दक्षिण कोकणातील संगमेश्वर, राजापूर, पन्हाळा, मलकापूर, खेळणा, शिरोळे, फोंडे, कोपल हे आणि कुलाबा, खंदेरी, राजकोट, सागरगड, पद्मदुर्ग, चौल हे उत्तर कोकणातील प्रदेश मराठ्यांकडेच होते.

छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच संभाजी महाराजांनी अष्टप्रधानांव्दारे राज्यव्यवस्था चालू ठेवल्याचे दिसते. वतनाचे निवाडे, किल्ल्यांची निगराणी, जमिनींचे महसूल पध्दत, आयात-निर्यात कर, चौथाईची वसुली इ. कामकाज व्यवस्थितपणे झालेले दिसते. सन १६८६-८७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला, तेव्हा त्यांनी पुनर्वसनासाठी कौलनामे दिले. व्यापाऱ्यांना सवलती देऊन महसुलात वाढ करण्याचा

प्रयत्न केला. सैनिकी व्यवस्थेत घोडदळ, पायदळ, तोफखाना तसेच समुद्रावरील शत्रूशी लढण्यासाठी कार्यक्षम नौदल निर्माण केले. एकाच वेळी मुघल, पोर्तुगीज, इंग्रज, सिद्दी यांच्याबरोबर त्यांना एकाकी लढा द्यावा लागला.

**उदार धार्मिक लोकनीति :** छत्रपती संभाजी महाराजांनी, छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण पुढे चालू ठेवून अनेक देवस्थाने, मठ, सत्पुरूष यांना वार्षिक नेमणुका (मोईन) पूर्ववत करून दिल्या. याप्रमाणे संभाजी महाराजांनी चिंचवड, मोरगाव, सज्जनगड, चाफळ, शिंगणवाडी, महाबळेश्वर इ. देवस्थानांची व्यवस्था नीट व्हावी म्हणून इनामे, सनदा चालू ठेवल्या. त्यांनी सातारा, चाफळ, सज्जनगड, कराड येथील अधिकाऱ्यांना आज्ञा करून श्रीरामाच्या उत्सवाच्या व्यवस्थेसंबंधी पत्रे पाठविली होती.

**शेवट** – त्यांची एकूण कारकीर्द नऊ वर्षांची. त्या संबंध काळात सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, वाडीकर सावंत, दळवी यांच्याशी त्यांना मुकाबला करावा लागला. उत्तरेतील अत्यंत प्रबळ शत्रू औरंगजेब याच्याशी मुकाबला करत असतानाच त्यांचा अत्यंत क्रूर रित्या शेवट झाला. शेख मुकर्रबखानाने संभाजी महाराजांस बेसावध स्थितीत किरकोळ चकमकीनंतर संगमेश्वरी कैद केले. तुळापूरजवळील **वढू** येथे दि.११ मार्च, १६८९ रोजी औरंगजेबाने त्यांचा निर्घृणपणे वध केला.

*******

स्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ